# महाराष्ट्र विधानपरिषद
## दिवसाच्या कामकाजाचा क्रम
## मंगळवार, दिनांक २५ जुलै, २०२३
## (सकाळी ९.३० ते ११.४५ वाजता)

(क) **(मंगळवार, दिनांक १८ जुलै, २०२३, बुधवार, दिनांक १९ जुलै, २०२३, गुरुवार, दिनांक २० जुलै, २०२३, शुक्रवार, दिनांक २१ जुलै, २०२३ व सोमवार, दिनांक २४ जुलै, २०२३ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव) —**
**सर्वश्री विक्रम काळे,** प्रविण दरेकर, चंद्रशेखर बावनकुळे, रामराजे नाईक-निंबाळकर, निलय नाईक, प्रसाद लाड, सतिश चव्हाण, सुरेश धस, रामराव पाटील, अनिकेत तटकरे, रणजितसिंह मोहिते-पाटील, अमोल मिटकरी, प्रा.राम शिंदे, सर्वश्री प्रविण दटके, गोपिचंद पडळकर, श्रीमती उमा खापरे, सर्वश्री श्रीकांत भारतीय, रमेश कराड, **वि.प.स. यांचा म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव — (मंत्र्यांचे उत्तर) —**

"अल निनोचा प्रभाव, सरासरीपेक्षा पाऊस कमी होण्याची शक्यता व उशिराने झालेले पावसाचे आगमन, यामुळे राज्यातील शेतकऱ्यांवर दुबार वा तिबार पेरणीची वेळ येण्याची शक्यता लक्षात घेऊन शेतकऱ्यांना सर्वतोपरी मदत करण्याची भूमिका शासनाने घेतली असणे, याबाबतच्या उपाययोजना युध्दस्तरावर करण्याची आवश्यकता असणे, राज्यातील बहुतांश लोकांचे जीवन कृषी क्षेत्राशी निगडीत असल्याने शेती हे अन्नधान्य, रोजगार व उपजीविकेचे साधन असणे, राज्यातील शेतकरी समर्थ व स्वावलंबी व्हावा, यासाठी शेतकऱ्यांना केंद्रबिंदू मानून शेतीचे उत्पादन व शेतकऱ्यांचा आर्थिक विकास या धोरणाला विद्यमान शासनाने परमोच्च स्थान दिले असणे, शेतकरी स्वयंनिर्भर व्हावा या उद्देशाने विविध नवनव्या योजना विद्यमान शासनाने हाती घेतल्या असणे, जलसंधारणाच्या सर्वाधिक योजना यशस्वीपणे राबविण्यात महाराष्ट्र हे देशात प्रथम क्रमांकाचे राज्य ठरले असणे, पाणी अडवून, जमिनीत जिरवणे गरजेचे असल्याने जलयुक्त शिवार योजना टप्पा २ राबवण्याचा निर्णय सरकारने घेतला असून ५४५ कोटी रुपयांची तरतूद केली असणे, अर्थसंकल्पातील "पंचामृत" संकल्पनेत "शाश्वत शेती — समृध्द शेतकरी " हे प्रथम अमृत असून त्याअनुषंगाने राज्यातील पीक विमा योजना व्यापक प्रमाणात राबविली जात असणे, कृषी क्षेत्रात महिलांचा सहभाग वाढविणे, गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार योजना पुढे सुरु ठेवणे, पशुजैव पदार्थ निर्मिती संस्था, पुणे येथे लम्पी चर्मरोग प्रतिबंधक लस निर्मिती सुरु करणे, छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजनेच्या उर्वरित पात्र शेतकऱ्यांना त्यांचे लाभ देणे, उत्पन्न वाढीसाठी कोकणात काजू बोंड प्रक्रिया केंद्रे स्थापन करणे, कृषी व संलग्न क्षेत्रातील अत्याधुनिक तंत्रज्ञानाचे उपयोजन व प्रसारण करण्यासाठी नागपूर येथे डॉ.पंजाबराव देशमुख कृषी महाविद्यालयात

अग्रिम प्रत

आंतरराष्ट्रीय कृषी सुविधा केंद्र स्थापन करणे, नागपूर, काटोल, कळमेश्वर, बुलढाणा इत्यादी जिल्ह्यात आधुनिक संत्रा प्रक्रिया केंद्र उभारणे इत्यादी धोरणे कार्यान्वीत करण्यात आली असणे, हळद पिकाची उत्पादकता वाढविण्यासाठी हिंगोली जिल्ह्यात "बाळासाहेब ठाकरे हरिद्रा (हळद) संशोधन व प्रशिक्षण केंद्राची" स्थापना करण्यात आली असणे, शेतकऱ्यांना दिवसा वीज पुरवठा करण्यासाठी "मिशन—२०२५ " कार्यक्रम हाती घेतला असणे व त्याअंतर्गत पुढील ३ वर्षात ३० टक्के कृषी वीज वाहिन्यांचे सौरऊर्जीकरण अपेक्षित असणे, संयुक्त राष्ट्र संघाच्या घोषणेस अनुसरून राज्यात महाराष्ट्र पौष्टिक तृणधान्य अभियान राबविण्यात येणे, शेतकऱ्यांच्या घरी जाऊन गोवंश पशुधनाचे संपूर्णतः मोफत प्रतिबंधात्मक लसीकरण करण्यात येणे, नमो शेतकरी महासन्माननिधी योजनेअंतर्गत केंद्र शासनाकडून शेतकऱ्यांना मिळणाऱ्या प्रति शेतकरी व प्रतिवर्षी ६ हजार रुपयात राज्य सरकारने आणखी ६ हजार रुपयांची भर घातली असणे, महात्मा ज्योतिराव फुले शेतकरी कर्जमुक्त योजनेअंतर्गत नियमित पीक कर्ज परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना ५० हजार रुपयांपर्यंत राज्य शासनाकडून प्रोत्साहनपर लाभ देण्यात येणे, पंतप्रधान पीक विमा योजनेच्या प्रिमियमचा भार शेतकऱ्यांवर पडू नये, यासाठी शेतकरी हिश्याचा भार उचलण्याचा व शेतकऱ्यांना फक्त १ रुपयात पीक विमा उपलब्ध करुन देण्याचा निर्णय घेतला असणे, शेतीच्या शाश्वत विकासासाठी महाकृषी विकास अभियान राबविण्यात येणे, "मागेल त्याला शेततळे" योजनेच्या धर्तीवर "मागेल त्याला फळबाग, ठिबक सिंचन, शेततळ्याचे अस्तरीकरण, शेडनेट, हरितगृह, आधुनिक पेरणी यंत्रे व कॉटन श्रेडर" हे घटक उपलब्ध करण्यात येणे, महाराष्ट्रातील काजूच्या सर्वंकष विकासासाठी "काजू फळपिक विकास योजना" लागू करण्याचा निर्णय सरकारने घेतला असणे, अमरावती येथे महत्वाकांक्षी प्रधानमंत्री मेगा इंटिग्रेटेड टेक्सटाईल रीजन अँड अपेरल (PM MITRA) पार्कचे लोकार्पण नुकतेच झाले असणे, विदर्भ, मराठवाड्यासह राज्यातील कापूस उत्पादकांना उत्पन्नवाढीची संधी मिळणार असणे, तसेच, या प्रकल्पामुळे राज्यात गुंतवणूक व रोजगार निर्मितीत मोठी भर पडणार असणे, गोपीनाथ मुंडे शेतकरी सुरक्षा सानुग्रह अनुदान योजना राज्यात राबवून अपघातग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबीयास २ लाख रुपयांपर्यंत सानुग्रह अनुदान देणे, नैसर्गिक आपत्तीमुळे झालेल्या नुकसानीचे पंचनामे करण्याकरिता माहिती तंत्रज्ञानाची मदत घेऊन मोबाईलद्वारे ई-पंचनामा करण्याची प्रक्रिया राबविण्यात येणे, देशी गोवंशाचे संवर्धन, संगोपन व संरक्षण होण्याकरिता महाराष्ट्र गोसेवा आयोगाची स्थापना करण्यात आली असणे, या आयोगाच्या माध्यमातून "गोवर्धन गोवंश सेवा केंद्र योजना" आणि "गोमाई मूल्यवर्धन योजना" या योजना राबविण्याचे प्रस्तावित असणे, राजे यशवंतराव होळकर महामेष योजनेअंतर्गत मेंढी पालनासाठी भरीव निधीची तरतूद केली असणे, प्रकल्पबाधित मच्छीमारांना नुकसान भरपाई देण्यासाठी व मच्छीमार

अग्रिम प्रत

कुटुंबीयांच्या कल्याणासाठी प्रकल्पाच्या २% किंवा कमाल ५ कोटी रकमेचा मत्स्य विकास कोष स्थापन करण्यात येणे, मच्छीमारांना डिझेल अनुदानासाठी असलेली यांत्रिक नौकेच्या कमाल १२० अश्वशक्तीच्या इंजिनाची मर्यादा काढल्याने सुमारे ८५ हजारापेक्षा अधिक मच्छीमारांना या योजनेचा लाभ मिळणे, केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री कृषी सिंचन योजने अंतर्गत २७ प्रकल्पांना आणि बळीराजा जलसंजीवनी योजने अंतर्गत ९१ प्रकल्पांना मंजुरी देण्यात येणे, परिणामी अनुक्रमे ३ लाख २७ हजार हेक्टर सिंचन क्षमता आणि १ लाख ७३ हजार हेक्टर सिंचन क्षमता निर्माण झाली असणे, शेत जमिनीचा ताबा आणि मालकी हक्क मिळविताना होणारे आपापसातील वाद मिटविताना जमिनीच्या अदलाबदल दस्तावरील मुद्रांक शुल्कात कपात करून ते नाममात्र एक हजार रुपये आणि नोंदणी शुल्क एक हजार रुपये करण्यासंदर्भात "सलोखा योजना" राबविण्यात येणे, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना आणि विविध विभागीय योजनांचे अभिसरण करून 'सुविधा संपन्न कुटुंब मिशन' आणि 'सर्वांगीण ग्राम संस्कृती योजना' राबविण्यात येणे, प्रशासनातील अधिकारी व पदाधिकारी यांनी संपूर्ण एक दिवस शेतकऱ्यांसोबत राहून शेतकऱ्यांच्या अडचणी समजून घेण्यासाठी 'माझा एक दिवस, माझ्या बळीराजासाठी' हा उपक्रम राबविण्यात येणे, पूरक व्यवसाय म्हणून मोठ्याप्रमाणावर शेतकरी दूध उत्पादनाकडे वळले असणे, अशा शेतकऱ्यांच्या बाबतीत मदतीची भूमिका घेऊन शासनाने दूध दर वाढविण्याबाबत निर्णय घेतला असणे, शासनाच्या या योजनांचा तळागाळातील शेतकऱ्यांपर्यंत लाभ मिळण्यासाठी या योजना अधिक कार्यक्षम करण्याची व त्यायोगे महाराष्ट्राला अधिकाधिक समृद्धीकडे नेण्यासाठी 'एकमेका सहाय्य करू, अवघे धरू सुपंथ' या उक्तीप्रमाणे करावयाची कार्यवाही व उपाय योजना"

(ख) **(गुरुवार, दिनांक २० जुलै, २०२३, शुक्रवार, दिनांक २१ जुलै, २०२३ व सोमवार, दिनांक २४ जुलै, २०२३ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव) —**

**सर्वश्री अंबादास दानवे**, सतेज उर्फ बंटी पाटील, एकनाथराव खडसे, जयंत पाटील, ॲड.अनिल परब, सर्वश्री शशिकांत शिंदे, अशोक ऊर्फ भाई जगताप, सचिन अहिर, कपिल पाटील, किशोर दराडे, नरेंद्र दराडे, अभिजीत वंजारी, राजेश राठोड, विलास पोतनीस, किरण सरनाईक, सुधाकर अडबाले, **वि.प.स. यांचा म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव — (मंत्र्यांचे उत्तर) —**

"राज्यात सातत्याने होणारा खातेबदल, कामाच्या विभागांकडे मंत्र्यांचे होत असलेले दुर्लक्ष, एकाच मंत्र्याकडे एकाहून अधिक जिल्ह्यांच्या पालकमंत्री पदाची जबाबदारी असणे, त्या माध्यमातून राज्याच्या विकासाला खीळ बसणे,

राज्यात शेतकऱ्यांचे आत्महत्येचे प्रमाण लक्षणीय असणे, शासनाने स्पष्ट आश्वासन देऊनही राज्यातील हजारो शेतकऱ्यांना अद्यापही कर्जमाफी आणि प्रोत्साहनपर रकमेचा लाभ न मिळणे, बोगस बी-बियाणे व खते विक्रीचे रॅकेट कार्यरत असूनही त्यावर गांभीर्याने कारवाई न होणे, राज्यातील नदी-नाल्यांचे खोलीकरण, रुंदीकरण व साखळी बंधाऱ्यांची कामे घेण्याची आवश्यकता असणे, क्षतिग्रस्त तलावांसह सध्या कार्यान्वित असलेले सिंचन प्रकल्प निधीअभावी रखडणे, "शासन आपल्या दारी" उपक्रमाच्या माध्यमातून ऑनलाईन सुविधा ऑफलाईन देऊन त्याला राजकीय स्वरुप देणे, जनतेस त्याचा काहीही फायदा न होणे व कार्यक्रमाची जाहिरात व अंमलबजावणीसाठी अब्जावधी रुपयांचा वारेमाप खर्च होणे, तत्कालीन विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांनी शेतकऱ्यांना सहाय्यभूत अनेक शिफारशी करणे, मात्र त्याकडे दुर्लक्ष झाल्यामुळे शासनाच्या भूमिकेबाबत नाराजीची भावना निर्माण होऊन त्यांनी मुदतपूर्व सेवानिवृत्ती घेणे, मागील सरकारने मंजूर केलेल्या समृद्धी महामार्गाचाच भाग असलेल्या जालना-नांदेड महामार्गाचे काम कुर्मगतीने सुरु असणे, जमिनी गेलेल्या शेतकऱ्यांना भूसंपादनाचा योग्य मोबदला न मिळणे, नांदेड- लातूर रेल्वे मार्गाचा प्रस्ताव अद्यापही तयार न होणे, मराठवाड्यामध्ये बूलेट ट्रेन प्रकल्प आणण्याकरिता शासन उदासीन असणे, हिंगोली सारख्या "ना उद्योग" भागातील सहकारी साखर कारखान्याना पॅकेज स्कीम इन्सेंटिव अंतर्गत मिळणाऱ्या सवलती काढून घेणे, विमानतळांचा विकास व अद्यावतीकरणाबाबत शासन उदासीन असणे, राज्यभर विमानतळे उपलब्ध असूनही निवडक शहरे वगळता इतरत्र विमानसेवा सुरू नसणे, मनमाड- औरंगाबाद- परभणी रेल्वेच्या दुपदरीकरणास सुरुवातही न होणे, नाशिक-पुणे रेल्वेमार्गाचे काम खोळंबणे, मराठवाडा व विदर्भात नवीन उद्योग व गुंतवणूक आणण्याबाबत शासनाच्या उदासीनतेमुळे बेरोजगारी व आत्महत्यांचे प्रमाण वाढणे, राज्यातील औद्योगिक प्रकल्प बाहेर जाणे, पाण्याच्या उपलब्धतेचा विचार न करता घाईगडबडीने वॉटर ग्रीडची संकल्पना राबविणे, बाभळी धरणातून वाहून जाणारे पाणी अडवण्यासाठी तेलंगणा राज्याच्या सहमतीने सर्वोच्च न्यायालयाकडे संदर्भ न करणे, पश्चिमवाहिनी नद्यांचे पाणी गोदावरी खोऱ्यात वळविण्याची आवश्यकता असणे, शासकीय रुग्णालये व महाविद्यालयांची झालेली 'दुरवस्था वैद्यकीय अधिकारी/कर्मचाऱ्यांची पदे न भरल्यामुळे रुग्णांची होत असलेली गैरसोय, एसईबीसी मधून ईडब्ल्यूएसचा विकल्प दिलेल्या मराठा उमेदवारांच्या नियुक्तीचे प्रकरण उर्जा विभागाकडे मागील दोन महिन्यांपासून प्रलंबित असणे, राज्यात वाढलेला वीज दर, वैधानिक विकास मंडळांच्या पुनरुज्जीवनाबाबत केंद्र शासनाकडे प्रलंबित असलेल्या प्रस्तावाचा पाठपुरावा न केल्यामुळे मागास भागात मोठ्या प्रमाणात निर्माण झालेला अनुशेष, जातीचे प्रमाणपत्र वेळेत मिळण्यात होत असलेली अक्षम्य दिरंगाई, परिणामी जनमानसात पसरलेला तीव्र असंतोष, मराठा व इतर

अग्रिम प्रत

आरक्षणाच्या संदर्भात प्रचंड मोर्चे, उपोषणे, आत्महत्या करुनही या बाबीकडे शासनाचे होत असलेले दुर्लक्ष, शासनाच्या विविध योजनांना लाभ व्हावा म्हणून ऑनलाईन पध्दतीने अर्ज करण्याची सोय असणे, असे अर्ज करीत असताना संपूर्ण दिवसभर सर्व्हर डाऊन राहत असल्याने केवळ एका अर्जासाठी संपूर्ण दिवस वाया जाणे, ग्रामीण भागात कार्यरत असलेल्या आशा सेविकांच्या व अंगणवाडी सेविकांचा पगारवाढीचा प्रश्न प्रलंबित असून काही महिन्यांपासून त्यांना पगारही न मिळणे, शिक्षक भरतीकडे दुर्लक्ष केल्यामुळे राज्याच्या शिक्षणाचा दर्जा खालावला असणे, राज्यात कोयता गँगची वाढलेली दहशत, सोशल मिडीयावर लोकांना धमक्या देण्याच्या प्रमाणात झालेली वाढ, राज्याची ढासळलेली अर्थव्यवस्था, महागाईचा मध्यम वर्गाला होणारा त्रास, रोजगार देण्याची संधी असतानाही राज्यातील विविध विभागाअंतर्गत रिक्त असलेल्या २ लाख ४० हजार जागा न भरणे, बार्टी, महाज्योती व सारथी विभागाच्या गलथान कारभारांमुळे लाखो विद्यार्थी प्रशिक्षणा पासून वंचित रहाणे पर्यायाने त्यांचे शैक्षणिक व रोजगार संदर्भात नुकसान होणे, ग्रामपंचायत व जिल्हापरिषदेच्या निवडणूका घेण्याकडे होत असलेले दुर्लक्ष, ग्रामपंचायत कर्मचारी यांच्या थकीत मागण्या, पंतप्रधान ग्राम सडक योजनेचे ४० हजार कोटी येणे बाकी, सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत केलेल्या कामाचे अद्यापही पैसे न मिळणे, ठराविक सदस्यांनाच विकास कामासाठी निधी उपलब्ध होत असल्याने समतोल विकासाच्या संकल्पनेला बसलेला खीळ, राज्य सरकारने पुरवणी मागणी व अर्थसंकल्पाच्या माध्यमातून विविध खात्यामध्ये जाहीर केलेली तरतूद तथापि प्रत्यक्षात निधी मिळण्यास होत असलेला विलंब, त्याची पुर्तता करण्यास आलेले अपयश, विविध विकासकामांना मंजूरी तथापि निधी अभावी कामे प्रलंबित असणे, महाविकास आघाडी सरकारच्या काळातील कामांना दिलेली स्थगिती अद्यापही न उठविल्यामुळे जनमानसात निर्माण झालेला तीव्र असंतोष, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(ग) लक्षवेधी सूचना — (म.वि.प. नियम १०१ अन्वये) —**

**(बुधवार, दिनांक १९ जुलै, २०२३ व गुरुवार, दिनांक २० जुलै, २०२३ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेली प्रलंबित लक्षवेधी सूचना) — [अनुक्रमांक (१)] —**

(१) **सर्वश्री प्रसाद लाड**, प्रविण दरेकर, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"मुंबई शहर आणि उपनगरातून वाहणाऱ्या मिठी नदीचे खोलीकरण, रुंदीकरण आणि सौंदर्यीकरण महापालिका आणि

अमुद्रित प्रत

एमएमआरडीएने करण्याचे ठरविले असले तरी गेल्या १७ वर्षापासून मिठी नदी गोड होणाच्या प्रतिक्षेत असून यावर १३०० कोटी रुपये खर्च करूनही मिठीचे सौंदर्यीकरण पूर्ण झाले नसल्याचे माहे मे, २०२३ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास येणे, या व्यतिरिक्त आणखी १ हजार कोटी विविध कामांसाठी खर्च केले जाणार असून या दोन्ही प्राधिकरणांनी मिठीसाठी बहुतांश कामे केली असली तरी प्रत्यक्षात मात्र प्रदूषणापासून मिठी नदीला मुक्ती मिळाली नसणे, प्रत्यक्षात जी कामे होती ती झालीच नसल्याने यामध्ये सर्विस रोड, नालेसफाई, सुशोभीकरणाचा समावेश असणे, सदर कामाकडे संबंधित अधिकारी जाणीवपूर्वक दुर्लक्ष करीत असणे, मुंबईसारख्या आंतरराष्ट्रीय शहराला पावसाळ्यात पुरापासून वाचविण्यासाठी मिठी नदीच्या पुर्नजिवीतेचे काम तातडीने पूर्ण करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(बुधवार, दिनांक १९ जुलै, २०२३, गुरुवार, दिनांक २० जुलै, २०२३ व शुक्रवार, दिनांक २१ जुलै, २०२३ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेली प्रलंबित लक्षवेधी सूचना)**

— [**अनुक्रमांक (२)**] —

(२) **श्री.अंबादास दानवे**, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे अंतर्गत अनुसूचित जातीतील मुलांना संशोधनाचे प्रशिक्षण देण्यासाठी सामाजिक न्याय विभागाच्या दिनांक २८ ऑक्टोबर, २०२१ रोजीच्या शासन निर्णयान्वये आगामी ५ वर्षासाठी ९० हजार विद्यार्थ्यांचे प्रशिक्षण कार्यक्रम मंजूर करण्यात आलेले असणे, उक्त शासन निर्णयान्वये मंजूर असलेल्या ३० प्रशिक्षण संस्थांद्वारे प्रशिक्षण देण्याचे काम सुरु असताना त्यांना डावलून अधिकाऱ्यांचे हितसंबंध असलेल्या नविन संस्थांची निवड करण्यासाठी नियमबाह्यरित्या निविदा प्रक्रिया राबविण्यात आलेली असणे, अकोला, अमरावती व बुलडाणा जिल्ह्यातील तीन अपात्र असलेल्या संस्थांनी बनावट कागदपत्रे, अशैक्षणिक शिक्षकेत्तर कर्मचारी, बोगस विद्यार्थी याद्या व बनावट देयके सादर करुनही सचिव, सामाजिक न्याय विभाग, तत्कालीन महासंचालक, बार्टी, येथील निविदा गुणांकन समितीतील अधिकारी व योजना विभागातील अधिकारी यांच्या संगनमताने अपात्र संस्थांच्या गुणांमध्ये वाढ करुन सदरहू संस्थांना पात्र केल्याचे निदर्शनास येणे, उक्त प्रकरणी दाखल करण्यात आलेल्या याचिकेनंतर मा. उच्च

अप्रकाशित प्रत

न्यायालय, नागपूर यांनी बोगस पध्दतीने काढण्यात आलेली निविदा/ कामाचे आदेश रद्द करण्याचे आदेश दिलेले असणे, तथापि उक्त प्रकरणातील दोषी अधिकारी व कर्मचारी यांचेवर शासनाने कोणतीच कारवाई केली नसल्याने त्यांनी अशाप्रकारे यवतमाळ व पुणे येथील IBPS व MPSC चे प्रशिक्षण केंद्र सुरु करण्यास मंजूरी दिलेली असणे, तसेच बार्टी या संस्थेने गत ४ महिन्यांच्या कालावधीत शासन निर्णयाचे उल्लंघन व मा. उच्च न्यायालयात दाखल असलेल्या याचिका डावलून सुमारे १२० निविदा प्रक्रिया राबविल्या असणे, उक्त निविदा वारंवार काढून रद्द करुन परत नव्याने निविदा प्रक्रिया राबवित असणे, अशाप्रकारे सचिव, सामाजिक न्याय विभाग यांनी अवैध संपत्ती जमा केली असणे, त्यामुळे अनुसूचित जातीचे अनेक विद्यार्थी नोकरी व रोजगारापासून वंचित राहिल्याने विद्यार्थ्यांमध्ये निर्माण झालेले असंतोषाचे वातावरण, उक्त प्रकरणी व सदरहू निविदा प्रक्रियांची चौकशी करुन अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना प्रशिक्षणापासून वंचित ठेवणाऱ्या संबंधित अधिकारी व कर्मचारी यांचेवर कारवाई व सचिव, सामाजिक न्याय विभाग यांच्या संपत्तीची चौकशी करण्यासाठी उच्च स्तरीय समितीची नेमणूक करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

**(गुरुवार, दिनांक २० जुलै, २०२३ व शुक्रवार, दिनांक २१ जुलै, २०२३ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या प्रलंबित लक्षवेधी सूचना) — [अनुक्रमांक (३) व (४)] —**

(३) **श्री.कपिल पाटील, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"मुंबई महानगरपालिकेच्या मालमत्ता करातून आणि पाणी पट्टीतून शाळा, महाविद्यालयांसह सर्व प्रकारच्या शिक्षण संस्था वगळण्यासाठी महापालिका प्रशासनास आदेश देण्याची आवश्यकता असणे, शासनाने यु डायस क्रमांक दिलेल्या मुंबई शहर व उपनगरातील प्रामुख्याने झोपडपट्टीतील महापालिका प्रशासनाने अनधिकृत ठरवलेल्या २६९ खाजगी प्राथमिक व माध्यमिक शाळांवरील दंडात्मक कारवाई त्वरीत रद्द करून त्यांना अटी व शर्तींच्या अधीन राहून मान्यता देण्याची आवश्यकता असणे, नामांकित व प्रयोगशील शिक्षण संस्थांना महानगरपालिकेच्या इमारती नाममात्र भाडयाने (लीजवर) उपलब्ध करण्याची गरज असणे, खाजगी अनुदानित आणि विनाअनुदानित प्राथमिक शाळांतील तसेच यु डायस क्रमांक मिळालेल्या तथापि मुंबई महानगरपालिकेने अनधिकृत ठरविलेल्या शाळांमधील विद्यार्थ्यांना

अग्रिम प्रत

भेदभाव न करता सरसकट सर्वांना शालेयपयोगी २७ वस्तू मोफत देण्याची आवश्यकता असणे, क्रिसेंट हायस्कूल, पायलीपाडा, ट्रॉम्बे आणि निर्मल विद्यालय, वडाळा, मुंबई अशा झोपडपट्टीतील अपघातग्रस्त व क्षतीग्रस्त शाळांना महानगरपालिकेच्या शाळेत अत्यंत तातडीने पर्यायी व्यवस्था निर्माण करण्याची आवश्यकता असणे, मुंबई मनपा क्षेत्रातील १०४ शाळांना मुंबई मनपाने १०० टक्के अनुदान देऊन वेतन सुरू करण्याची गरज असणे, याबाबत शासनाची भूमिका आणि करावयाची कार्यवाही."

(४) **ॲड.अनिल परब**, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"वांद्रे (पूर्व ) येथील शासकीय वसाहतीचा पुनर्विकासाचा प्रकल्प अद्यापी रखडला असल्याचे नुकतेच माहे डिसेंबर,२०२२ मध्ये निदर्शनास येणे, शासकीय वसाहतीतील रहिवाशांना मालकी हक्काच्या सदनिका देण्यासाठी भूखंड उपलब्ध करण्याच्या प्रस्तावास महाविकास आघाडी सरकारने सन २०२२ मध्ये दिलेली तत्वतः मान्यता, प्रस्तावास तत्वतः मान्यता मिळूनही अद्याप वसाहतीच्या पुनर्विकासाचा प्रकल्प धोरणात्मक निर्णयासाठी रखडलेला असणे, परिणामी स्थानिक रहिवाशांना जीव मुठीत घेऊन रहावे लागत असणे, याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, वांद्रे (पूर्व) येथील शासकीय वसाहत ही ९६ एकर शासकीय भूखंडावर सन १९५९ ते १९७५ दरम्यान तत्कालिन विनिर्देशानुसार बांधण्यात येणे, सदर वसाहतीमध्ये एकूण ३७० इमारती असून ४७८२ सदनिका असणे, पुनर्विकास प्रकल्पांतर्गत क आणि ड वर्ग कर्मचाऱ्यांसाठी बांधण्यात येणाऱ्या २००० घरांचे बांधकाम संथगतीने सुरू असणे, धोकादायक स्थितीमधील इमारतींमधील कर्मचाऱ्यांचे ३ महिन्यांमध्ये अन्यत्र स्थलांतरण करण्याचे आदेश दिनांक २ मार्च २०२३ रोजी मा. मुख्यमंत्री यांनी दिलेले असणे, परंतु सदर प्रक्रियादेखील संथगतीने सुरू असणे, सदरहू इमारतीचे आयुष्यमान हे केवळ ५० ते ६० वर्षांचेच असल्याने सद्यस्थितीत इमारतीची अवस्था अत्यंत बिकट असणे, इमारतीचा काही भाग कोसळलेला, तर काही छताचा भाग पडलेला असणे, यासंदर्भात स्थानिक लोकप्रतिनिधिंनी सातत्याने शासनाकडे विविध आयुधांद्वारे लक्ष वेधूनही कोणतीच कार्यवाही होत नसणे, वारंवार बैठका घेण्याचे आश्वासित करून देखील बैठका न होणे, याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, सद्यस्थितीत वसाहतीतील निवासस्थानाची दुरवस्था व सदर इमारतीमध्ये वास्तव्य करणाऱ्या कर्मचाऱ्यांची

अप्रकाशित प्रत

मानसिकता पाहता शासकीय वसाहतीचा पुर्नविकास तातडीने घेण्याची नितांत आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका."

**(शुक्रवार, दिनांक २१ जुलै, २०२३ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या प्रलंबित लक्षवेधी सूचना) — [अनुक्रमांक (५) ते (८)] —**

**(५)** **सर्वश्री धीरज लिंगाडे,** अभिजित वंजारी, राजेश राठोड, अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.वजाहत मिर्झा, सर्वश्री सुधाकर अडबाले, सतेज ऊर्फ बंटी पाटील, जयंत आसगावकर, डॉ.प्रज्ञा सातव, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"राज्यातील ८५ टक्के पत्रकारांना रुपये २० हजार इतके कमी वेतन मिळत असून त्यामध्ये कुटूंबियांचा उदरनिर्वाह चालविणे कठीण असल्याने बदलत्या काळानुसार पत्रकारांना जोडधंदा करणे आवश्यक आहे, परंतु बँकांमधून कर्ज उपलब्ध होत नसणे, पत्रकारांना नोकरीचे कोणतेही संरक्षण नसणे, त्यामुळे पत्रकारिता क्षेत्रात काम करणाऱ्यांमध्ये पसरलेली तीव्र नाराजीची भावना, पत्रकारांसाठी कर्ज उपलब्ध व्हावे व लोकशाहीचा चौथा स्तंभ म्हणून काम करणाऱ्या पत्रकारांना अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाच्या धर्तीवर पत्रकार कल्याणकारी महामंडळ स्थापन करण्यात यावे, यासाठी विविध प्रसार माध्यमांचे काम करणारे पत्रकार व कर्मचारी यांच्याकडून सातत्याने होत असलेली मागणी, याबाबत शासनाने सकारात्मक निर्णय घेऊन राज्यातील पत्रकारांसाठी स्वतंत्र आर्थिक विकास महामंडळ स्थापन करण्याची आवश्यकता व याबाबत शासनाची प्रतिक्रिया."

**(६)** **सर्वश्री सुनिल शिंदे,** विलास पोतनीस, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"मुंबईत दिनांक १ जून ते २९ जून, २०२३ या २९ दिवसांच्या कालावधीत तब्बल ४३५ झाडे, फांद्या पडण्याच्या घटना घडल्या असून त्यात आठ जणांचा दुर्दैवी मृत्यू आणि ४ जण जखमी झाले असणे, यामध्ये मुंबई शहरात झाडे आणि फांद्या तुटण्याच्या ११२ घटनांमध्ये एकाचा मृत्यू आणि १ जण जखमी झाला असणे, मुंबई पश्चिम उपनगरात झाडे आणि फांद्या पडण्याच्या सर्वाधिक २१४ घटना घडल्या असून त्यात सात जणांचा मृत्यू व १ जण जखमी झाला असणे, पावसाळ्यात वादळवाऱ्याने झाडांच्या आणि फांद्यांच्या तुटण्याने

अग्रिम प्रत

रहिवाशी भागातील जीवांचे आणि मालमत्तेचे नुकसान टाळण्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेने पावसाळापूर्व कामांमध्ये मुंबईतील धोकादायक झाडे आणि फांद्या तोडण्याचे काम, तसेच धोकादायक झाडे आणि फांद्या तुटून पडण्याचा धोका असल्यास, त्याची माहिती महानगरपालिकेला देण्याचे आवाहनही मुंबईकरांना केल्याचा दावा बृहन्मुंबई महानगरपालिकेने केला असणे, तसेच जी झाडे कमी धोकादायक आहेत, त्यांची शास्त्रोक्त पद्धतीने छाटणी केली असल्याचे देखील महानगरपालिकेने जाहीर केले असणे, तरीदेखील बृहन्मुंबई महानगरपालिका अखत्यारीतील झाडे आणि फांद्या कोसळून निष्पाप नागरिकांना जीव गमवावा लागल्याच्या घटना सातत्याने घडलेल्या असणे, भविष्यात देखील अशा प्रकारच्या घटनांत वाढ होण्याची दाट शक्यता निर्माण झाली असणे, रस्त्यांचे काँक्रिटीकरण करताना झाडांपासून किमान दोन ते तीन मीटर जागा सोडणे आवश्यक असतानाही महानगरपालिकेने नियुक्त केलेले रस्त्यांच्या कंत्राटदारांकडून याची खबरदारी घेण्यात न येणे, परिणामी, झाडांना लागुनच करण्यात येत असलेल्या काँक्रिटीकरणामुळे झाडांच्या मुळांना धोका निर्माण होणे, याकडे बृहन्मुंबई महानगरपालिकेचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, यास्तव मुंबईत झाडे आणि फांद्या तुटून नागरिकांना जीव गमवावा लागू नये, याकरिता शासनाने तातडीने करावयाची ठोस कार्यवाही, उपाययोजना आणि शासनाची प्रतिक्रिया."

(७) **श्री.रमेशदादा पाटील,** ॲड.निरंजन डावखरे, श्रीमती उमा खापरे, श्री.रामदास आंबटकर, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"उरणच्या ओएनजीसी प्रकल्पामधून मोठ्या प्रमाणात दूषित वायू हवेत सोडण्यात येत असून या परिसरातील नागरिकांना त्याचा मोठ्या प्रमाणावर त्रास होऊन त्यांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला असल्याची बाब माहे जून, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास येणे, याकडे प्रदूषण नियंत्रण मंडळाने दुर्लक्ष केल्याने उरण परिसरातील रहिवाशांमध्ये नाराजीची भावना निर्माण झालेली असणे, उरण परिसरातील जेएनपीए, ओएनजीसी, बीपीसीएल, उरण-पनवेल रस्त्यावर २४ तास धडधडणाऱ्या दगडखाणी (क्वाऱ्या) व जेएनपीए अंतर्गत असलेल्या रासायनिक प्रकल्पांमुळे याआधीच जल, वायू प्रदूषणात मोठ्या प्रमाणात वाढ झालेली असणे, ओएनजीसी प्रकल्पामधून मागील काही दिवसापासून मोठ्या प्रमाणात हवेत सोडण्यात येणाऱ्या वायूमुळे प्रदूषणात मोठी वाढ होत असल्याच्या तक्रारी वाढत असल्याने श्वसनाच्या आणि इतर व्याधीचा त्रास

अस्वीकृत

नागरिकांना जाणवू लागलेला असणे, याकडे प्रदूषण नियंत्रण मंडळाचे अधिकारी हे प्रदूषण नियंत्रण ठेवण्याची दक्षता घेतील अशी अपेक्षा नागरिक व्यक्त करीत असणे, मागील दीड वर्षाच्या कालावधीत उरण ओएनजीसी विरोधात वायू प्रदूषणाबाबत नागरिकांकडून वाढत्या तक्रारी बाबत ओएनजीसी प्रकल्पाच्या वरिष्ठांना नागाव ग्रामपंचायतीने नुकतेच पत्र पाठवले असल्याची माहिती ग्रामविकास अधिकारी यांनी दिलेली असणे, दिवसा व रात्री हवेतून उग्रदर्पाचा वास येणे, यामुळे परिसरातील नागरिकांमध्ये श्वसनाचा तसेच इतर शारीरिक व्याधी निर्माण होण्याची भीती एका डॉक्टरांनी व्यक्त केली असणे, याबाबत महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या अधिकाऱ्यांकडे तक्रार करण्याची प्रक्रिया सुरू केल्याचेही सांगण्यात येणे, त्यामुळे उरण परिसरातील रासायनिक कंपन्यांमधून २४ तास अखंडपणे वायू प्रदूषण होत असून याचा नागरिकांना मोठ्या प्रमाणात त्रास सहन करावा लागत असल्याने नागरिकांमध्ये शासनाप्रती नाराजी व्यक्त होत असणे, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(८) **श्री.अरुण लाड, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **कृषी मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"सांगली जिल्हयात बनावट, भेसळयुक्त कृषी औषधांची विक्री राजरोसपणे सुरु असणे, यातून द्राक्ष उत्पादक, भाजीपाला उत्पादक तसेच सामान्य शेतकऱ्यांना लाखो रुपयांचा गंडा घालण्यात आल्याचे निदर्शनास येणे, बोगस आणि बनावटगिरीचा धंदा चालु असणे, अनेक ठिकाणी पॅकिंग मुंबई, बंगळूरचे आणि औषध मात्र स्थानिक अशा प्रकारे गैरप्रकार सुरु असणे, जिल्ह्यात वारणा टापूसह मिरज पश्चिम भाग, आटपाडी-जत तालुक्यांचा पश्चिम भाग, तासगाव, खानापूर, लेंगरे परिसर, वाळवा-शिराळा तालुक्यात मोठया प्रमाणात भाजीपिके लागवडीचे क्षेत्र असून या भागांतील अनेक शेतकऱ्यांना असा बनावट औषधांचा फटका बसल्याचे निदर्शनास येणे, शेतकऱ्यांची बोगस किटकनाशकांमधून फसवणूक मोठया प्रमाणात होत असून आर्थिक आणि पिकांचे असे दुहेरी नुकसान होत असणे, सबब सांगली जिल्हयासह राज्यातील शेतकऱ्यांमध्ये निर्माण झालेले असंतोषाचे वातावरण व असुरक्षिततेची भावना, त्याबाबत शासनाने चौकशी करुन भेसळयुक्त शेती औषधांची विक्री करणाऱ्यांवर कारवाई करावी अशी शेतकरी वर्गाकडून होत असलेली मागणी, त्याबाबत शासनाने केलेली

अस्वीकृत प्रत

व करावयाची कार्यवाही व शासनाची भूमिका."

**(सोमवार, दिनांक २४ जुलै, २०२३ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेली प्रलंबित लक्षवेधी सूचना) — [अनुक्रमांक (९)] —**

(९) **श्री.जयंत पाटील, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"राज्यासह देशात घरोघरी देवांच्या मुर्तींचे पूजन केले जात असून विधीवत त्याचे विसर्जन जलाशयात केले जात असणे, रायगड जिल्हयातील पेण, हमरापूर हे गणेश मुर्तींचे माहेरघर समजले जात असणे, महाराष्ट्रात कोकणासह, मराठवाडा, विदर्भ, पश्चिम महाराष्ट्रासह देश विदेशात या मुर्तींची निर्यात मोठ्या प्रमाणात केली जात असणे, या वर्षी दिनांक १९ ते २८ सप्टेंबर, २०२३ रोजी गणेशोत्सव महाराष्ट्रासह देश विदेशात साजरा होत असणे, परंतु केंद्र शासनाने प्लास्टर ऑफ पॅरिसच्या मुर्तींवर बंदी घातली असल्याने राज्यातील मुंबई, पुणे, पेण, पनवेल, हमरापूर अशा विविध ठिकाणी असणाऱ्या मुर्तीकारांचे रोजगार व दैनंदिन उपजिवीकेवर त्याचा मोठ्या प्रमाणात परिणाम होऊन आर्थिक संकटाला सामोरे जावे लागत असणे, येत्या गणेशोत्सवात प्लास्टर ऑफ पॅरिसच्या घरगुती गणेशमुर्तीवर बंदी घालण्याचा निर्णय नुकताच मुंबईसह राज्यातील इतर महानगरपालिका प्रशासनाने जाहीर केला असणे, या निर्णयाला मूर्तिकारांकडून व मूर्तिकार संघटनांकडून तीव्र विरोध होत असणे, गणेशोत्सव हा महत्त्वाचा मोठा पारंपरिक उत्सव असून यासाठी लागणाऱ्या पीओपी मूर्ती बनवण्याच्या व्यवसायावर अनेक कुटुंबे अवलंबून असणे, सबब राज्य सरकारच्या वतीने नेमण्यात आलेल्या तांत्रिक समितीचा अंतिम अहवाल येत नाही तोपर्यंत पीओपीच्या मूर्तीवर सरसकट बंदी घालणे अशास्त्रीय, असंविधानिक आणि अयोग्य ठरेल, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

अप्रकाशित प्रत

## (दुपारी १२.०० वाजता)

**एक : प्रश्नोत्तरे**

**दोन : कागदपत्रे सभागृहाच्या पटलावर ठेवणे —**

**मुख्यमंत्री** : "महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांचा सन २०२१-२०२२ या वर्षाचा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**तीन : (क) म.वि.प. नियम ९३ अन्वये सूचना — (असल्यास).**

**(ख) म.वि.प. नियम ९३ अन्वये सूचनांची निवेदने —**

**(सोमवार, दिनांक २४ जुलै, २०२३ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेली प्रलंबित म.वि.प. नियम ९३ अन्वये सूचनेचे निवेदन) — [अनुक्रमांक (१)] —**

(१) **श्री.शशिकांत शिंदे, वि.प.स**. यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील **सूचना क्रमांक १** वर **मदत व पुनर्वसन मंत्री** निवेदन करतील :-

"मौजे कारंडवाडी (देगाव, ता. जि. सातारा) गावाच्या हद्दीत ट्रॅक्टर ट्रॉली पलटी होऊन झालेल्या अपघातात मृत्युमुखी पडलेल्या महिलांच्या कुटुंबियांना आर्थिक मदत मिळण्याबाबत."

(२) **श्री.सचिन अहिर, वि.प.स**. यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील **सूचना क्रमांक ३** वर **मदत व पुनर्वसन मंत्री** निवेदन करतील :-

भिमा आसखेड (ता.खेड, जि.पुणे) येथील प्रकल्पग्रस्त आंदोलक शेतकऱ्यांच्या विविध मागण्यांबाबत.

**चार : म.वि.प. नियम १०१ — अ अन्वये विशेष उल्लेख — (असल्यास)**

## - मध्यंतर -

**पाच : सन २०२३-२०२४ च्या पुरवणी मागण्यांवर चर्चा — (दुसरा व शेवटचा दिवस)**

**खालील मंत्र्यांच्या मागण्यांवर चर्चा होईल.**

**१)** मुख्यमंत्री

**२)** उप मुख्यमंत्री (गृह, विधी व न्याय, जलसंपदा व लाभक्षेत्र विकास, ऊर्जा)

**३)** उप मुख्यमंत्री (वित्त व नियोजन)

**४)** अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री

**५)** सहकार मंत्री

**६)** महसूल,पशुसंवर्धन आणि दुग्धव्यवसाय विकास मंत्री

अग्रिम प्रत

७) वने,सांस्कृतिक कार्य, मत्स्यव्यवसाय मंत्री

८) वैद्यकीय शिक्षण, विशेष सहाय्य मंत्री

९) उच्च व तंत्रशिक्षण, वस्त्रोद्योग आणि संसदीय कार्य मंत्री

१०) आदिवासी विकास मंत्री

११) ग्रामविकास व पंचायत राज, पर्यटन मंत्री

१२) पाणी पुरवठा व स्वच्छता मंत्री

१३) सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री

१४) मृद व जलसंधारण मंत्री

१५) कृषी मंत्री

१६) उद्योग मंत्री

१७) सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री

१८) सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री

१९) अल्पसंख्याक विकास व औकाफ, पणन मंत्री

२०) शालेय शिक्षण, मराठी भाषा मंत्री

२१) अन्न व औषध प्रशासन मंत्री

२२) गृहनिर्माण, इतर मागास बहुजन कल्याण मंत्री

२३) राज्य उत्पादन शुल्क मंत्री

२४) महिला व बालविकास मंत्री

२५) क्रीडा व युवक कल्याण,बंदरे मंत्री

२६) कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री

२७) मदत व पुनर्वसन, आपत्ती व्यवस्थापन मंत्री

अप्रकाशित प्रत

**सहा : शासकीय विधेयक –**

**विधानसभेने संमत केल्यास – विधेयक विचारात घेणे :-**

"सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३१ - महाराष्ट्र (द्वितीय पुरवणी) विनियोजन विधेयक, २०२३"

---

**सात** : **सर्वश्री प्रविण दरेकर**, विजय ऊर्फ भाई गिरकर, अमोल मिटकरी, प्रसाद लाड, सतिश चव्हाण, विक्रम काळे, श्रीमती उमा खापरे, सर्वश्री निरंजन डावखरे, प्रविण दटके, अनिकेत तटकरे, सुरेश धस, गोपिचंद पडळकर, प्रविण पोटे-पाटील, चंद्रशेखर बावनकुळे, श्रीकांत भारतीय, रामदास आंबटकर, रणजितसिंह मोहिते-पाटील, प्रा.राम शिंदे, सर्वश्री निलय नाईक, राजहंस सिंह, रामराव पाटील, रमेशदादा पाटील, वसंत खंडेलवाल, रमेश कराड, **वि.प.स. यांचा म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव –**

"राज्यात कायदा व सुव्यवस्था चोख ठेवण्याच्या दृष्टीने विद्यमान शासनाने सेफ्टीचे पर्सेप्शन तयार केले असणे, अनादी काळापासून प्रत्येक राज्य व्यवस्थेमध्ये गुन्हे घडत असले तरी देशातील अन्य राज्यांच्या दृष्टीने आपला महाराष्ट्र गुन्हेगारी रोखण्यात आघाडीवर असल्याचे निदर्शनास येणे, गुन्हेगारीचे समूळ उच्चाटन करण्यासाठी मागील वर्षभरात अनेक गुन्हेगारांवर तडीपारीची कारवाई केली असणे, २३९ लोकांवर एमपीडीए अंतर्गत कारवाई करण्यात येणे, अंमली पदार्थांच्या संदर्भात २०२२ मध्ये हजारो गुन्हे दाखल असून मोठ्या प्रमाणावर अंमली पदार्थ जप्त करण्यात येणे, खंडणीबाबत घडणारे गुन्हे मोठ्या प्रमाणात कमी झाले असणे, प्रत्येक जिल्ह्यात जिल्हाधिकाऱ्यांच्या नेतृत्वाखाली ॲन्टी नार्कोटीक सेल तयार करण्यात आला असणे, शाळा-महाविद्यालयांच्या परिसरात नार्कोटीकच्या संदर्भात शासनाने झिरो टोलरन्स पॉलीसी सुरु केली असणे, विद्यमान शासनाने २० हजार पोलीस भरतीची एकत्रित प्रक्रिया राबवून सर्व रिक्त पदे भरण्यासाठी पद भरतीचे निर्बंध शिथील केले असणे, पोलीस शिपाई ते पोलीस निरीक्षक यांना वर्षाकाठी देय असलेल्या नैमितिक रजा १२ ऐवजी २० करण्याचा निर्णय घेतला असणे, पोलीसांना सवलतीच्या दरात गृह कर्जासाठी सन २०१७ ची लोकप्रिय योजना जी मागील शासनाने बंद केली होती ती पुन्हा लागू केली असणे, राज्यात ३४ फॉरेन्सिक लॅब तयार करण्यात आल्या असून टेक्निकल एव्हिडन्स हा ह्युमन एव्हिडन्सपेक्षा बोलका असल्याने व ह्युमन एव्हिडन्स होस्टाईल होऊ शकतो परंतु टेक्निकल एव्हिडन्स होस्टाईल होऊ शकत नाही ही वस्तुस्थिती विचारात घेता फॉरेन्सिक लॅब अधिक सक्षम करण्याच्या दृष्टीने शासनाकडून प्रयत्न होत असल्याचे निदर्शनास येणे, राज्य पोलीस व मुंबई पोलीस यांनी ऑपरेशन मुस्कानच्या माध्यमातून आतापर्यंत सुमारे ३८ हजार बालकांना त्यांच्या घरी सुखरूप पोहचविल्याचे निदर्शनास येणे, देशात हरवलेली बालके व पळून आलेली बालके शोधून त्यांच्या घरापर्यंत पोचविण्याच्या कामात मुंबई व महाराष्ट्र पोलीसांचा प्रथम क्रमांक असल्याचे निदर्शनास येणे, राजकीय व सामाजिक आंदोलनातील गुन्ह्यांमध्ये जून २०२२ पर्यंत दोषारोपपत्र दाखल झालेले खटले मागे घेण्याचा निर्णय घेतला असणे, पोलीस दलातील शिपाई, पोलीस शिपाई, चालक, सशस्त्र पोलीस संवर्गातील विविध कारणास्तव रिक्त झालेली पदे तात्काळ भरण्यास शासनाने मान्यता दिली असणे, राज्यात गणपती व दहिहंडी उत्सवाच्या कालावधीत ज्या गुन्ह्यांमध्ये दिनांक ३१ मार्च, २०२० पर्यंत दोषारोपपत्र दाखल झाले आहेत व ज्या खटल्यांमध्ये अटी-शर्तींची पुर्तता होते असे खटले मागे घेण्याची कार्यवाही सुरू असणे, कोरोना प्रतिबंधक आदेश लागू झाल्यानंतर या आदेशाचे उल्लंघन झाल्यामुळे दिनांक २१ मार्च, २०२० ते दिनांक ३१ मार्च, २०२२

पर्यंत दाखल खटले मागे घेण्याची कायदेशीर कार्यवाही सुरू असणे, पोलीस कर्मचा-यांना पुरेशी निवासस्थाने उपलब्ध करून देण्यासाठी दिर्घकालीन, मध्यमकालीन व तात्काळ अशा तीन टप्प्यांवर उपाययोजना करण्याचा तसेच म्हाडाच्या मदतीने मुंबईतील पोलीस निवासस्थानांचा पुनर्विकास करण्याचा शासनाने निर्णय घेतला असणे, महिलांच्या संदर्भात वेगवेगळ्या जिल्ह्यात विशेष न्यायालये व जलद गती न्यायालये तयार करण्यात येणे, तसेच समुपदेशन केंद्रे स्थापन करण्यात येणे, बलात्काराच्या गुन्ह्यांबाबतीत ६० दिवसात चार्जशीट दाखल होण्याचे प्रमाण १८ टक्क्याहून वाढविण्यात पोलीस प्रशासानाला यश आल्याचे निदर्शनास येणे, राज्यात संवेदनशील असलेल्या नक्षलग्रस्त भागाकरिता शासनाने पुरेसा निधी उपलब्ध केलेला असणे, अनुसूचित जाती-जमाती प्रवर्गाचे रक्षण करण्याच्या दृष्टीने शासन प्राथमिकता देत असल्याने त्यानुषंगाने कन्व्हीक्शनचे प्रमाण वाढविण्यासाठी शासनाचे प्रयत्न असणे, राज्यातील संकटग्रस्त महिलांना तातडीने आवश्यक माहिती व मदत मिळण्यासाठी स्वतंत्र टोल फ्री क्रमांक १८१ महिला हेल्पलाईन सुरू केली असणे, राज्यात स्टीट क्राईम डिटेक्शनमध्ये गुणात्मक बदल करण्याच्या दृष्टीने कमांड ॲण्ड कंट्रोल सिस्टीम प्रकर्षाने राबविण्याचा व आणखी ६ हजार सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याचा निर्णय घेतला असणे, राज्यात गणपती व दहिहंडी उत्सव मोकळ्या वातावरणात पार पडावे या दृष्टीने शासनाने त्यावरील निर्बंध उठविले असणे, पंढरपूरला जाणा-या वारक-यांना टोलमाफी केली असणे, गणेशमुर्तीच्या उंचीवरील निर्बंध उठविले असणे, गणेशोत्सवाला कोणतेही शासकीय शुल्क भरावे लागू नये याची दक्षता घेतली असणे, ज्येष्ठ नागरिकांना लुबाडणे, एकाकी राहणाऱ्या ज्येष्ठ दांपत्यांना संरक्षण इत्यादी बाबतीत शासनाने कडक धोरण राबविल्यामुळे ज्येष्ठ नागरिकांसंबंधीच्या गुन्ह्यांत कपात झाली असणे, शासनाने मागील वर्षभरात न्यायव्यवस्था बळकट करण्याच्या दृष्टीने प्रत्येक स्तरावर न्यायालयांची स्थापना करणे व न्यायालयांसाठी नवीन पदे निर्माण करण्याचे धोरण स्वीकारले असणे, राज्यातील कारागृह क्षमतेपेक्षा कैद्यांची संख्या अधिक झाल्याने राज्यात वेगवेगळ्या जिल्ह्यात नवीन कारागृहे बांधण्याची कार्यवाही सुरु असणे, कायदा व सुव्यवस्थेच्या बाबतीत कठोर उपाययोजना करण्याबाबत शासनाने घेतलेल्या विविध निर्णयांमुळे राज्यातील महिला, बालके, उपेक्षित वंचित घटक व ज्येष्ठ नागरिक चिंतामुक्त व मोकळ्या वातावरणात राहत असल्याचे निदर्शनास येणे, राज्यातील कायदा व सुव्यवस्था अधिक प्रखर करण्याच्या दृष्टीने सर्वंकष विचार विनिमयातून नव-नवे उपक्रम राबविण्याची व त्यायोगे राज्य पोलीस दल अधिक सक्षम करण्याची आवश्यकता व त्याबाबत करावयाची उपाययोजना."

आठ : **अर्धा-तास चर्चा — म.वि.प. नियम ९२ अन्वये (बैठकीच्या शेवटी) —**

(१) **सर्वश्री रमेश पाटील,** रामदास आंबटकर, श्रीमती उमा खापरे, **वि.प.स.**

"**आदिवासी विभागातील सर्व रिक्त पदे तात्काळ भरण्याबाबत**" या

अस्वाक्षरित प्रत

विषयावरील **श्री. नागोराव गाणार, वि.प.स.** यांचा दिनांक १३ मार्च, २०२३ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तराची यादी क्रमांक २ मधील अता. प्र.क्र.१५०७७ ला दिलेल्या उत्तरातून उद्भवणाऱ्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.

**(२)** **सर्वश्री विलास पोतनीस,** सुनिल शिंदे, आमश्या पाडवी, **वि.प.स.**

"**बृहन्मुंबई महानगरपालिकेची आणि रहिवाशांची फसवणूक करणाऱ्या विकासकावर कारवाई करण्याबाबत**" या विषयावरील **श्री.विलास पोतनीस व इतर वि.प.स.** यांचा तारांकित प्रश्न क्रमांक १४८३७ ला दिनांक २४ ऑगस्ट , २०२२ रोजी दिलेल्या उत्तरातून उद्भवणाऱ्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.

**विधान भवन,**
मुंबई,
दिनांक : २४ जुलै, २०२३

**जितेंद्र भोळे**
सचिव (१) (कार्यभार),
महाराष्ट्र विधानपरिषद

अस्थायित प्रत